# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 10/09/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यु

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर शारदा चौक कुही येथे योगेश जिवनदास मांढरे, वय 31 वर्ष, रा. बाबा रामदेव कावळापेठ, ह. मु. शारदा चौक, कुही हे एमएसईबी मध्ये लाईनमॅन असुन दि. 28/08/2020 चे रात्री 20.30 वा. दरम्यान कळमेश्वर मंदीर नवतलाव कुही येथील लाईन गेल्याने त्यास लाईन गेल्याबाबत माहिती मिळाल्याने तो लाईन कशाने गेली ते पाहण्याकरीता व डीपीचा डिवो टाकत असतांना त्यास ईलेक्टीक करंट लागुन तो खाली जमीनीवर पडल्याने त्याच्या छातीला, मानेला, डाव्या पायाला, व पाठीला मार लागल्याने त्याला प्रथम उपचारकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती करण्यात आले होते उपचारा दरम्यान डाक्टरांनी तपासुन दि. 29/08/2020 चे 02.10 वा मृत घोषित केले. सदर मर्गचे कागदपत्रे आज रोजी पोस्टेला प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार मपोउपनि शुभांगी तकीत या 8766934595 हे करीत आहे.

### नैसर्गिक विज पडुन मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावर मौजा मकरधोकडा शेत शिवार येथे फिर्यादीचे वडील मृतक नामे– बापुराव गणपत गुडेकार, वय 60 वर्ष, रा. मकरधोकडा वार्ड क्र. 3 हे नेहमी प्रमाणे सुरेश नारायण बजारे रा. मकरधोकडा यांच्या शेतामध्ये 09.30 वा. दरम्यान कामाला गेले होते. दिनांक 09/09/2020 चे 12.30 वा. वाजता दरम्यान मृतक हे शेतामध्ये काम करीत असता दुपारी 12.30 वा. सुमारास अचानक वादळी पाऊस आल्याने त्यांच्या अंगावर नैसर्गिक विज पडल्यानंतर त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय बापुराव गुडेकार, वय 32 वर्श, रा. मकरधोकडा, वार्ड क्र. 3 यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार अरूण जयसिंगपुरे 9049175485 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर